# प्रेसनोट

दि.१२/१०/२०१७

तंत्रज्ञानाच्या युगात दिवसेंदिवस इंटरनेट आणि सोशल मिडियाचा वापर वाढत असताना त्याबरोबरच सायबर गुन्हयांचे प्रमाणही वाढत आहे. या गुन्हयांबाबत युवा वर्गाचा समावेश लक्षणीय आहे. याचबरोबर अल्पवयीन विदयार्थी या गुन्हयांना बळी पडत आहेत. सायबर गुन्हयाबद्दल विदयार्थी आणि शिक्षक अनभिज्ञ असल्याने या गुन्हयांना कशाप्रकारे सामोरे जावे याची माहिती नसते. सायबर गुन्हयाच्या या समस्येवर मात करण्यासाठी पुणे पोलिसांनी **#WeFightCC** हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमातुन १००० हुन अधिक शिक्षक आणि २०००० हुन अधिक विदयार्थ्यांना मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**#WeFightCC** हा उपक्रम तीन टप्प्यामध्ये राबविला जाणार असुन पहिल्या टप्प्यात सोशल मिडिया मार्फत सायबर गुन्हेगारीबाबत पोस्टर्स, बॅनर्स, बुकलेट इ. प्रसारित करण्यात येणार आहे. तसेच पुणे शहरातील शाळा आणि कॉलेज मधील विदयार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण होण्याकरिता वक्तृत्व स्पर्धा, ब्रिदवाक्य (स्लोगन) स्पर्धा, वुई फाईट सायबर क्राईम इ. बाबत ऑनलाईन व ऑफलाईन प्रकारच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. दुस-या टप्प्यामध्ये शाळा व कॉलेज मधील शिक्षकांकरिता सायबर गुन्हेगारीशी सामना कसा करावा याबाबत प्रशिक्षण (Training of trainers) देण्यात येणार आहे तसेच शहर स्तरावर कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. तिस-या टप्प्यामध्ये शाळा व कॉलेजमध्ये सायबर तज्ञ, मानसशास्त्रतज्ञ हे प्रशिक्षणाव्दारे विदयार्थ्यांना सायबर गुन्हेगारीबाबत सविस्तर माहिती देणार आहेत. याव्यतिरिक्त सायबर क्राईमबाबत इंटरनेटमार्फत तज्ञ व्यक्तींचे ब्लॉग, व्हिडीओ ब्लॉग इ.मार्फत जनजागृती करण्यात येणार आहे.

**#WeFightCC** हा सायबर क्राईम जनजागृती करिता राबविण्यात येणारा राज्यातील पहिलाच उपक्रम असुन सदर उपक्रमासाठी सीडॅक, गुगल, करियर कॉर्नर या संस्थांचे सहाय्य मिळणार आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ)
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
(आर्थिक व सायबर) पुणे शहर.


LETS PROTECT
STUDENTS FROM
CYBER CRIME
#WEFIGHTCC
AN INITIATIVE
TO FIGHT
CYBER CRIME
An Initiative by
Pune Police
100+ Institutes | 1000 + Teachers | 20,000 Students


Lets Join Hands
to Fight the
Menace of
Cyber Crime
#WEFIGHTCC
An Initiative to
Fight Cybercrime
An Initiative by
Pune Police
100+ Institutes | 1000 + Teachers | 20,000 Students




#WeFight
पुणे शहर पोलीस


Virus


#WEFIGHTCC
AIMS TO EQUIP SCHOOLS TO DEAL WITH CYBER CRIME
STUDENTS COMPETITIONS
PARTICIPATE & WIN ATTRACTIVE PRIZES!!